JAIRAJ™

*The Legacy of Taste & Goodness*

# समाचार

**Vol.: 04**






## चेअरमनचे मनोगत

प्रिय वाचक मित्रहो,

जयराज ग्रुपने गेल्या काही महिन्यांमध्ये उचललेल्या अनेक महत्वपूर्ण पावलांचा विचार करताना मला अतिशय अभिमान वाटतो आहे. यातील प्रत्येक पावलामागे विश्वास, गुणवत्ता आणि प्रगतीचा आमचा वारसा आहे. हा काळ आणि ही वेळ आमच्यासाठी अत्यंत महत्वपूर्ण आणि उत्साही ठरली आहे.

झी २४ तास वर आल्यामुळे आम्ही थेट हजारो ग्राहकांशी जोडले गेलो, तर आउटडोअर जाहिरात मोहिमेद्वारे ब्रँडची ओळख दृढ झाली. रिलायन्स स्मार्ट बझार मधील जयराजच्या उपस्थितीने नव्या संधींचे दरवाजे खुले केले, तर नॉर्वेपर्यंतचा आमचा विस्तार ही घरच्या चवीला आंतरराष्ट्रीय व्यासपीठ मिळवून देणारा एक मोठा टप्पा ठरला.

अस्सल भारतीय स्वादाची आपुलकी घेऊन जयराजची उत्पादने किती दूरवर पोहोचली आहेत, याचा आनंददायी उत्सव म्हणजे, ओस्लो कलर फेस्टिव्हल 2025 मधील आमचा सहभाग. समाजाचे ऋण फेडण्याच्या आमच्या बांधिलकीला आम्ही सातत्याने प्राधान्य देत आलो आहोत. जयराज स्पोर्ट्स अँड कन्व्हेन्शन सेंटरचा शुभारंभ व पुणे रेल्वे स्थानकासाठी व्हीलचेअर्सची देणगी हे सामाजिक उपक्रम आम्ही अतिशय आस्थेने केले.

याव्यतिरिक्त सगळ्यांत महत्त्वाचं म्हणजे, भारताच्या 2025–26 च्या सर्वाधिक विश्वासार्ह ब्रँड्सपैकी एक म्हणून आम्हाला मिळालेली मान्यता आणि प्रतिष्ठा, आम्ही नम्रतेने व कृतज्ञतेने स्वीकारली. भारतातील काही प्रतिष्ठित ब्रँड्ससोबत हा सन्मान मिळवणे हा एक समृद्ध करणारा अनुभव ठरला. या प्रवासात आमची साथ दिल्याबद्दल तुमचे मन:पूर्वक आभार. तुमच्या विश्वास आणि पाठिंब्यामुळे, भविष्य उज्ज्वल असणार यात शंकाच नाही.

आपला,
श्री. राजेश शहा
चेअरमन, जयराज ग्रुप

# उद्योगक्षेत्रातील बातमी

## खरीप अन्नधान्य उत्पादनासाठी भविष्य उज्ज्वल

येणाऱ्या 2025-26 खरीप हंगामात भारत अन्नधान्य उत्पादनात नवा विक्रम प्रस्थापित करेल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. याचे कारण म्हणजे सरासरीपेक्षा अधिक पावसाचे हवामान खात्याचे अंदाज. कृषी मंत्रालयाच्या तिसऱ्या अंदाजानुसार, 2024-25 च्या खरीप हंगामात भारताचे अन्नधान्य उत्पादन 168.06 दशलक्ष टन इतके विक्रमी नोंदवले गेले. शक्यता आहे.

## 2025 मध्ये अन्नधान्य क्षेत्रासाठी उपयोगी सरकारी योजना

भारत सरकारकडून कृषी, अन्नधान्य उत्पादन आणि शेतकऱ्यांना पाठबळ देणारी अनेक प्रभावी धोरणे राबवली जात आहेत. यामध्ये चांगल्या उत्पादनासाठी उपाय, शेतकऱ्यांना योग्य दर मिळावेत यासाठी प्रयत्न, तसेच आधुनिक शेती तंत्रांचा अवलंब यावर भर देण्यात आला आहे. या प्रभावी धोरणांमुळे, अनुदानांमुळे आणि बाजारपेठेतील प्रवेशामुळे शेती हा एक लाभदायी व्यवसाय ठरू शकतो. अशा काही महत्त्वाच्या योजना म्हणजे प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना (PMGKAY), डाळींसाठी आत्मनिर्भरता मिशन, प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजना, प्रॉडक्शन लिंक्ड इन्सेन्टिव्ह स्कीम (PLI Scheme), व पीएम किसान संपदा योजना.






# जयराज ग्रुपमधील घडामोडी




## विश्वास आणि गुणवत्तेसह प्रदर्शित! झी 24 तास वर जयराज ग्रुपची झलक

जयराज ग्रुपने आपल्या प्रादेशिक प्रचार मोहिमेमध्ये एक महत्त्वाचा टप्पा गाठला. महाराष्ट्रातील आघाडीच्या बातम्यांच्या वाहिन्यांपैकी एक असलेल्या झी 24 तास वर जाहिरात मोहिमेची सुरुवात करत, जयराज ब्रँडने गुणवत्ता, वारसा आणि विश्वास यांचा संदेश थेट महाराष्ट्रातील हजारो घरांपर्यंत पोहोचवला. माध्यमांद्वारे व्यक्त झाल्याने महाराष्ट्रातील स्थानिक समाजाशी आणि त्यांच्या भावविश्वाशी नाते जोडणे, महाराष्ट्रीय लोकांचे मन जिंकणे, व विस्तार वाढविणे जयराज ग्रुपला शक्य झाले आहे.

## जिथे खरी गरज असते, तिथे आमचा ब्रँड असतो.
### ग्रामीण भागात मार्केटिंगद्वारे अधिकाधिक सक्षम होण्यात जयराज ग्रुपला यश

संपूर्ण महाराष्ट्रातील वितरण व विक्री केंद्रांवर, डीलर बोर्ड्स आणि स्टँडी ब्रँडिंगसारख्या प्रभावी ग्राउंड मार्केटिंग उपक्रम जयराज ग्रुप राबवीत आहे. ग्राहक आणि व्यावसायिक भागीदारांच्या मनात विश्वास व ओळख निर्माण व्हावी, तसेच ब्रँडची त्यांना वारंवार आठवण व्हावी, यासाठी या प्रक्रियेत प्रत्येक घटकाचा विचारपूर्वक समावेश केलेला आहे. या जाहिरातींमुळे ग्रामीण व निमशहरी भागांमध्ये ब्रँड ठळकपणे उठून दिसतो, आणि संपूर्ण राज्यात विस्तारलेले जयराज ग्रुपचे वितरण नेटवर्क अधोरेखित करतो.










## सर्वोत्तम गुणवत्ता तुमच्या आणखी जवळ!
### आता रिलायन्स स्मार्ट बझार मध्येही उपलब्ध

जयराज ग्रुपची सर्वोत्तम उत्पादने आता रिलायन्स स्मार्ट बझार मध्ये उपलब्ध आहेत. प्रीमियम दर्जाची अन्नधान्य उत्पादने अधिकाधिक ग्राहकांपर्यंत नेण्याच्या दृष्टीने उचललेले हे महत्वाचे पाऊल आहे. उत्कृष्ट प्रतीच्या तांदळापासून डाळी, मसाले, दर्जेदार सुकामेवा आणि पोषणमूल्यांनी युक्त सुपरफूड्सपर्यंत, जयराज ग्रुपची दर्जेदार व निवडक उत्पादने आता या प्रसिद्ध रिटेल दालनात खरेदी करता येतील.




## अस्सल भारतीय चवीचा विविध खंडांमध्ये प्रवास
### जयराज ग्रुपची उत्पादने आता नॉर्वेमध्येही उपलब्ध

नॉर्वेमध्ये आपली उत्पादने अधिकृतपणे सादर करून, जयराज ग्रुपने आपल्या आंतरराष्ट्रीय प्रवासातील एक अभिमानास्पद टप्पा गाठला आहे. भारतीय स्वाद आणि परंपरेची अस्सल ओळख असलेली 70+ किराणा उत्पादने आता नॉर्वेच्या बाजारपेठेत उपलब्ध असून, ती भारतीय व जागतिक ग्राहकांची मनपसंत निवड ठरत आहेत.

प्रीमियम धान्ये, पौष्टिक डाळी, पारंपरिक तांदळाच्या जाती आणि रोजच्या उपयोगातील अन्नधान्य. जयराज ग्रुप भारताची ही अस्सल चव आता जगभर पोहोचत आहे. नॉर्वेतील पदार्पण म्हणजे जयराज ग्रुपच्या जागतिक विस्ताराचे, आणि खालीशीर भारतीय अन्न उत्पादने जगभर नेण्याच्या संकल्पनेचे महत्त्वाचे पाऊल आहे.

## घर का खाना, अगदी हाकेच्या अंतरावर!
### ओस्लो कलर फेस्टिव्हल 2025 मध्ये जयराज ग्रुपची रंगतदार उपस्थिती



इंडोनॉर्ड या नॉर्वेतील भारतीय समुदायाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संस्थेमार्फत, जयराज ग्रुपने ओस्लो कलर फेस्टिव्हल 2025 मध्ये आपल्या अस्सल भारतीय अन्नधान्य उत्पादनांसह रंगतदार आणि संस्मरणीय पदार्पण केले. संस्कृती आणि रंगांच्या या उत्सवात, तांदूळ, डाळी, मसाले आणि सुपरफूड्स यांसह जयराजच्या 70+ उत्पादनांच्या श्रेणीने सर्व उपस्थितांना घरच्या चवांची अनुभूती दिली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून जयराज ग्रुपने नॉर्वेमधील आपल्या रिटेल व्यवसायाची अधिकृत सुरुवातही केली, आणि हा टप्पा भारतीय स्वाद जगभर पोहोचवण्याच्या प्रवासात महत्त्वाचा ठरणार आहे.

## सामाजिक उपक्रम / OR सीएसआर उपक्रम

### प्रवास सुलभ करणारे
### अर्थपूर्ण योगदान पुणे रेल्वे स्थानकासाठी व्हीलचेअर्स प्रदान

प्रवाशांना मदत म्हणून पुणे रेल्वे स्थानकाला 20 व्हीलचेअर्स भेट देत जयराज ग्रुपने आपली सामाजिक संवेदना पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे. ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि गर्भवती महिलांसाठी प्रवास अधिक सुलभ, आरामदायक आणि सन्मानजनक व्हावा, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. समावेशक आणि संवेदनशील समाजनिर्मितीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे प्रतीक म्हणजेच हा उपक्रम.




JAIRAJ™

*The Legacy of Taste & Goodness*

पत्ता:
जयराज आणि कंपनी
५३०-३१, गेट क्र. ५, मार्केट यार्ड,
गुलटेकडी, पुणे-४११०३७, महाराष्ट्र, भारत

व्यापारविषयक चौकशीसाठी संपर्क: 020-24270440/1/2
किंवा ईमेल: enquiry.jairaj@gmail.com

आम्हाला सोशल मीडियावर फॉलो करण्यासाठी स्कॅन करा

ऑनलाईन खरेदीसाठी स्कॅन करा

आम्हाला फॉलो करा The Jairaj Group jairajgroup jairajindia jairajgroup